मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 07 जून 2026 | पान- 1

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कामकाजाला पुन्हा वेग

## सर्वसाधारण व स्थायी समितीच्या सभा पुन्हा सुरू होणार; सर्वसाधारण सभा 15 जूनला

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक बिनविरोध झाल्याने त्या निवडणुकीची आचारसंहिता शुक्रवारी (दि. 5) उठवण्यात आली आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे ठप्प झालेले कामकाज शनिवारपासून (दि. 6) नियमितपणे सुरू होणार आहे

विधानपरिषदेचे आचारसंहिता 18 मे रोजीपासून लागू झाली होती. ती आचारसंहिता 25 जूनपर्यंत होती. त्या निवडणुकीसाठी 18 जूनला मतदान होणार होते. मतमोजणी 22 जूनला होणार होती. त्यानंतर 25 जूनला संपूर्ण निवडणूक प्रकिया पूर्ण होवून आचारसंहिता उठणार होती. आचारसंहिता लागल्याने महापालिकेचे दैनंदिन कामकाज ठप्प झाले होते. धोरणात्मक निर्णय घेता येत नसल्याने महापालिका सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभा तसेच, विविध विषय समितीच्या सभा रद्द झाल्या होत्या. परिणामी, महापालिकेत पदाधिकारी व नगरसेवकांची वर्दळ घटली होती.

मात्र, ती निवडणूक बिनविरोध झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे विक्रम काकडे यांच्याविरोधात एकाही उमेदवाराचा अर्ज नसल्याने त्याची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील आचारसंहिता शुक्रवारी संपुष्टात आणण्यात आली आहे. तसे आदेश उपमुख्यनिवडणूक अधिकारी विक्रम निकम यांनी काढले आहेत. त्यामुळे महापालिकेचे दैनंदिन कामकाज शनिवारपासून (दि. 6) पूर्वरत सुरू होणार आहे. शनिवारी व रविवारी साप्ताहिक सुटी असल्याने सोमवारपासून (दि. 8) दैनंदिनक कामकाज जोमाने सुरू होईल, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

निवडणूक आचारसंहिता उठल्याने महापालिकेचे नियमित कामकाज जोमात सुरू होणार असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. महापालिकेचे पदाधिकारी व नगरसेवकांनी आचारसंहिता उठल्याचे स्वागत केले आहे. त्यामुळे महापालिका सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभा, विविध विषय समिती सभेचे कामकाज पुन्हा नव्या जोमाने सुरू होणार आहे.



### सर्वसाधारण सभा 15 जूनला

» पिंपरी-चिंचवड महापालिकेची मासिक सर्वसाधारण सभा 15 जूनला होणार आहे. सभेच्या पटलावर स्वीकृत दहा नगरसेवकांची निवड करणे, महापालिकेच्या सुधारित प्रारुप विकास योजनेवर (डीपी) सुनावणी घेण्यासाठी समितीची स्थापना करणे, मालमत्ताकर वसुलीसाठी शहरात अ, ब आणि ड असा तीन विभागाचे अ आणि ब असे नवीन दोन विभाग तयार करणे, पुनावळे येथील महापालिकेची 91 गुंठे जागा खासगी संस्थेला 30 वर्षांसाठी भाडे तत्वावर देणे हे चार विषय आहेत.

> निवडणूक आचारसंहिता संपुष्टात आल्याने धोरणात्मक निर्णय घेण्यास आता कोणताही अडसर नाही. महापालिकेची मासिक, साप्ताहिक सभेचे कामकाज सुरू होते. मात्र, त्यात धोरणात्मक निर्णय घेतले जात नव्हते. आता सर्व सभा नियमितपणे घेतल्या जातील. स्थायी समितीची बुधवारी (दि. 10) सभा आहे. सर्वसाधारण सभा 15 जूनला आहे. त्याचे विषयपत्र प्रसिद्ध करण्यात आले आहे.
>
> - उल्हास जगताप, नगर सचिव, महापालिका.

# 31 दिवसांत 75 हजार बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई!

## वाहतूक पोलिसांनी मे महिन्यात नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरोधात विशेष मोहीम राबवली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती वाहनसंख्या, औद्योगिक क्षेत्रांमधील वर्दळ आणि महामार्गांवरील वाढलेली वाहतूक लक्षात घेऊन वाहतूक पोलिसांनी मे महिन्यात नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरोधात विशेष मोहीम राबवली. या मोहिमेत एका महिन्यात ७४ हजार ६५६ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून, त्यांच्याकडून सहा कोटी ७६ लाख ३० हजार ९०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत चाकण, भोसरी, तळेगाव, हिंजवडी, तळवडे आणि चिखलीसारखी मोठी औद्योगिक क्षेत्रे आहेत. तसेच, हिंजवडी, तळवडे, चिखली ही आयटी पार्क क्षेत्रे असून, देहू व आळंदी ही तीर्थक्षेत्रे आहेत. आयुक्तालय हद्दीतून पाच महत्त्वाचे महामार्ग जात असल्याने दररोज लाखो वाहनांची ये-जा सुरू असते. राज्यातील, तसेच देशातील नागरिक हे रोजगारानिमित्त पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात स्थायिक झाल्याने शहराचा वेगाने विस्तार आणि वाढ होत आहे. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी वाहतूक शाखेकडून नियमितपणे कारवाई केली जाते.

पोलिसांनी १ ते ३१ मे २०२६ या कालावधीत विशेष तपासणी मोहीम राबविली. या मोहिमेत नंबर प्लेटमध्ये बदल, सिग्नल तोडणे, मोबाइलवर बोलत वाहन चालविणे, ट्रिपल सीट, विरुद्ध दिशेने वाहन चालविणे, नो पार्किंगसह विविध नियमभंगांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. कारवाईमध्ये सर्वाधिक नो पार्किंगची १९ हजार ३४० जणांवर कारवाई करण्यात आली. ११ हजार ५८० टोईंग कारवाई करण्यात आल्या. ट्रिपल सीटची ६ हजार ५३९ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.



# देहूरोड-निगडी मार्गावरील दोन भुयारी मार्गांना हिरवा कंदील

## देहूरोड येथील केंद्रीय विद्यालय, ऑर्डनन्स फॅक्टरी येथे भुयारी मार्ग होणार; खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती



**पिंपरी | प्रतिनिधी**

देहूरोड निगडी रस्त्यावर केंद्रीय विद्यालय व देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरी या दरम्यान दोन भुयारी मार्ग (अंडरपास) मंजूर झाले आहेत. या भुयारी मार्गाचे काम सुरू करण्यास सदन कमांड ब्रिगेडियर आणि कॅन्टोन्मेंट बोर्डाने तत्वतः मान्यता दिली आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून रखडलेले भुयारी मार्गाचे काम सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचे मावळचे शिवसेना श्रीरंग बारणे यांनी सांगितले.

देहूरोड येथील सदन कमांड येथे एनएचआय एमएसआरडीसी, देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड, देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरी प्रतिनिधी आणि ब्रिगेडर यांच्या प्रमुख आधिकारी व संबंधित विभागाचे प्रमुख यांच्या बरोबर विविध प्रश्नांसंदर्भात खासदार बारणे यांनी शनिवारी आढावा बैठक घेतली. सदन कमांड ब्रिगेडियर आशिष कटोज, कर्नल अमित श्रीवास्तव, देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हेमंत यादव, एमएसआरडीसीचे उपअभियंता विकास पिंपळकर, देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सदस्य कैलास पानसरे, शिवसेना देहूगाव शहर प्रमुख सुनिल हगवणे, युवासेना मावळ लोकसभा अध्यक्ष राजेंद्र तरस, ऑर्डनन्स फॅक्टरी देहूरोड एम्प्लॉय युनियन अध्यक्ष मोहन घुले उपस्थित होते. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील प्रलंबित प्रश्न, चालू असलेली कामे याचा आढावा घेण्यात आला.

खासदार बारणे म्हणाले, देहूरोड निगडी रस्त्यावर केंद्रीय विद्यालय व देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरी या दरम्यान दोन भुयारी मार्ग मंजूर झाले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून एमएसआरडीसीकडून भुयारी मार्गाला मान्यता मिळाली आहे. या भुयारी मार्गाचे काम सुरू करण्याबाबत चर्चा झाली. त्याला सदन कमांड ब्रिगेडियर आणि कॅन्टोन्मेंट बोर्डाने तत्वतः मान्यता दिली. त्यामुळे अनेक वर्षांपासून रखडलेले काम सुरू होईल. काळोखे मळा ते हगवणे वस्तीदरम्यानचा रस्ता संरक्षण विभागाच्या जागेतून जातो. रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावरील खड्डे तत्काळ बुजविण्यात येणार आहेत.

श्री संत तुकाराम महाराजांची पालखी पुढील महिन्यात पंढरपूरला जाणार आहे. पालखी मार्ग संरक्षण विभागाच्या जागेतून जातो. या रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. या रस्त्यांची सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने दुरुस्ती करण्यात येणार आहे. त्याला ब्रिगेडियर यांनी मान्यता दिली आहे. किवळे येथील महावितरणची लाईन संरक्षण विभागातून जात आहे. त्याबाबतही बैठकीत चर्चा झाल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

### भुयारी मार्गामुळे वाहतुकीला दिलासा

» देहूरोड-निगडी रस्त्यावर केंद्रीय विद्यालय आणि देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरीदरम्यान दोन भुयारी मार्ग उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सदर्न कमांड आणि देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाने या प्रकल्पाला तत्त्वतः मान्यता दिल्याने अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या कामाला गती मिळणार आहे. या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने नागरिकांना कोंडीचा सामना करावा लागतो. भुयारी मार्ग पूर्ण झाल्यानंतर वाहतुकीचा प्रवाह सुरळीत होण्यास मदत होणार आहे. तसेच अपघातांचे प्रमाण कमी होऊन परिसरातील नागरिक, विद्यार्थी आणि कर्मचारी यांना सुरक्षित व जलद प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

### प्रलंबित विकासकामांनाही मिळणार वेग

» आढावा बैठकीत देहूरोड कॅन्टोन्मेंट हद्दीतील विविध प्रलंबित विकासकामांवरही चर्चा करण्यात आली. काळोखे मळा ते हगवणे वस्ती दरम्यानच्या रस्त्याची दुरवस्था दूर करण्यासाठी खड्डे तातडीने बुजविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच पुढील महिन्यात होणाऱ्या संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पालखी मार्गाची दुरुस्ती करण्यासही मान्यता देण्यात आली. संरक्षण विभागाच्या जागेतून जाणाऱ्या विविध नागरी सुविधांच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली. त्यामुळे परिसरातील रस्ते, वीज आणि वाहतूक सुविधांशी संबंधित विकासकामांना येत्या काळात अधिक वेग मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# पवना धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने घट; केवळ 23 टक्के जलसाठा शिल्लक

## उष्णतेमुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचे बाष्पीभवन, पाऊस लांबणीवर पडल्यास शहराला पाणीटंचाईचा फटका बसू शकतो.




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणारा मावळातील पवना धरणातील पाणीसाठा वेगाने कमी होत आहे. प्रचंड उष्णतेमुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचे बाष्पीभवन होत आहे. परिणामी, धरणाचे पात्र पाण्याविना उघडे पडले आहे. त्यामुळे धरणातील उंचवटे, दगड, माती व गाळ दृष्टीस पडत आहे. पाऊस लांबणीवर पडल्यास शहराला पाणीटंचाईचा फटका बसू शकतो.

पिंपरी-चिंचवड शहरासह नगरपालिका, ग्रामपंचायत तसेच, एमआयडीसीला वर्षभर पवना धरणातून पाणी दिले जाते. महापालिका पवना धरणातून सोडलेले पाणी पवना नदीवरील रावेत येथील बंधार येथून अशुद्ध जलउपसा केंद्रात उचलले जाते.

दररोत 550 एमएलडी अशुद्ध पाणी उपसा करून ते प्राधिकरण, निगडी येथील सेक्टर क्रमांक 23 येथील जलशुद्धीकरण केंद्रात पाठवले जाते. तेथे शुद्धीकरण प्रक्रिया करून संपूर्ण शहराला पिण्याचे पाणी पुरवले जाते. तसेच, आंद्रा पाणी योजनेतून निघोजे बंधारा येथून दररोज 90 एमएलडी पाणी उचलून चिखली जलशुद्धीकरण केंद्राकडे पाठवले जाते. तेथे पाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी त्या परिसराला पुरवले जाते

प्रचंड उष्णतेमुळे बाष्पीभवन होऊन पवना धरणातील पाणीसाठा झपाट्याने घटत आहे. धरणात गुरुवारी रात्रीपर्यंत केवळ 23 टक्के पाणीसाठा शिल्लक होता. धरणाचे पात्र मोठ्या प्रमाणात कोरडे पडले आहे. तेथून शेतकरी गाळ काढून नेत आहेत. धरणातील पाणीसाठा पिंपरी-चिंचवड शहराला जून महिन्याच्या अखेरपर्यंत पुरेल, असा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे. मात्र, पावसाळा लांबणीवर पडल्यास पिंपरी-चिंचवड शहराला पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो.

### धरणसाठ्यातील साठा झाला कमी

» मावळ तालुक्यातील आंद्रा धरणात सध्या 33 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. आंद्रा पाणी योजनेतून महापालिकेकडून निघोजे येथील इंद्रायणी नदी बंधाऱ्यातून दररोज 90 एमएलडी पाणी उचलले जाते. चिखली केंद्रात ते पाणी शुद्ध करून परिसराला दिले जाते. भामा आसखेड धरणात 31 टक्के पाणीसाठा पातळी आहे. भामा आसखेड पाणी योजना प्रकल्प अर्धवट असल्याने पिंपरी-चिंचवड शहराला अद्याप अतिरिक्त 167 एमएलडी पाणी उपलब्ध झालेले नाही. शहराजवळच्या मुळशी धरणात 19 टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. त्या धरणाचे पाणी मुळा नदीस सोडले जाते.

# कचरा डेपो प्रकरणी पुणे महापालिकेविरोधात अवमान याचिका दाखल करण्याचा इशारा

## पुणे महापालिकेच्या उरुळी देवाची आणि फुरसुंगी येथील कचरा डेपोत उघड्यावर कचरा साठवला जात असल्याचा आरोप आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरात तयार होणारा कचरा उरुळी देवाची आणि फुरसुंगी येथे असलेल्या पुणे महापालिकेच्या कचरा डेपो टाकला जातो. या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी या भागात प्रकल्प उभारण्यात आले आहेत. या प्रकल्पात दररोज कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावावी. येथे कोणत्याही प्रकारचा कचरा उघड्यावर टाकू नये तसेच साठवून ठेवू नये, असे आदेश न्यायालयाने पुणे महापालिकेला दिले आहेत. मात्र याकडे दुर्लक्ष करत महापालिका येते कचरा साठवत असल्याचा आरोप या भागातील लोकप्रतिनिधी केला आहे.

'उरुळी देवाची येथील कचरा डेपोमधील जुन्या कचऱ्यावर शास्त्रीय पद्धतीने बायोमायनिंग केले जात नाही. कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिकेने नव्याने नेमलेल्या ठेकेदारांनी प्रदूषण मंडळाची परवानगी मिळण्यापूर्वीच काम सुरू केले आहे, असा ठपका राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठेवला आहे. कचरा डेपोत उघड्यावर कचरा टाकू नका, असा आदेश न्यायालयाने दिला होता. पण, या आदेशाचे उल्लंघन करण्यात आल्याने महापालिकेच्या विरोधात अवमान याचिका दाखल करणार आहोत,' अशी माहिती देवाची उरुळी- फुरसुंगी नगरपरिषदेच्या नगरसेवकांनी पत्रकार परिषदेत दिली.

'कचरा डेपोत उघड्यावर कचरा टाकला जात आहे. असे असताना महापालिका आयुक्त नवल किशोर राम कचरा डेपोमध्ये शास्त्रीय पद्धतीने बायोमायनिंग प्रक्रिया सुरू असल्याचे धडधडीत खोटे बोलत आहेत. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करून डेपोच्या आवारात हजारो टन कचरा साठविला जात आहे,' असा आरोप नगरपरिषदेचे नगरसेवक सचिन हरपळे, संतोष हरपळे, अमोल कापरे, अजिंक्य ढमाळ यांनी पुणे महापालिकेत पत्रकार परिषद घेऊन केला.



### पावसाळ्यात प्रदूषणाचा धोका

» महापालिकेने एप्रिल महिन्यापासून शहरातील ओला आणि सुका मिश्र कचरा डेपो परिसरात साठवण्यास सुरुवात केल्याचा आरोप करण्यात आला आहे. पावसाळ्यात या कचऱ्यामुळे दुर्गंधी, भूजल प्रदूषण आणि आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांनीही कचरा साठवणुकीविरोधात आवाज उठवला असून घनकचरा विभागातील अधिकाऱ्यांवर दुर्लक्ष केल्याचा आरोप केला आहे. मात्र, घनकचरा विभागाचे उपायुक्त संतोष वारुळे यांनी प्रदूषण मंडळाची नोटीस अद्याप प्राप्त झाली नसून बायोमायनिंगचे काम शास्त्रोक्त पद्धतीने सुरू असल्याचा दावा केला आहे.

### अवमान याचिकेचा इशारा

» देवाची उरुळी-फुरसुंगी नगरपरिषदेच्या नगरसेवकांनी पुणे महापालिकेवर न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. न्यायालयाने कचरा डेपोमध्ये कोणताही कचरा उघड्यावर टाकू नये किंवा साठवू नये, असे स्पष्ट निर्देश दिले होते. मात्र, या आदेशाकडे दुर्लक्ष करून हजारो टन कचरा डेपो परिसरात साठवला जात असल्याचा दावा करण्यात आला. त्यामुळे महापालिकेविरोधात न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्याचा इशारा नगरसेवकांनी दिला आहे. या प्रकरणामुळे उरुळी देवाची आणि फुरसुंगी परिसरातील नागरिकांमध्येही तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

### बायोमायनिंग प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

» उरुळी देवाची येथील जुन्या कचऱ्यावरील बायोमायनिंग प्रक्रिया शास्त्रोक्त पद्धतीने होत नसल्याचा आरोप स्थानिक लोकप्रतिनिधींनी केला आहे. नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या ठेकेदारांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची आवश्यक परवानगी मिळण्यापूर्वीच काम सुरू केल्याचा ठपकाही ठेवण्यात आला आहे. नगरसेवकांच्या मते, महापालिका प्रशासन बायोमायनिंग प्रक्रिया सुरळीत सुरू असल्याचा दावा करत असले तरी प्रत्यक्षात कचऱ्याचे ढीग वाढत आहेत. त्यामुळे पर्यावरणीय नियमांचे पालन होत आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

# महापालिकेची मोठी ऑफर! वनमहोत्सवात अवघ्या 5 रुपयांत मिळणार विविध वृक्षरोपे

## वृक्षप्रेमी आणि स्वयंसेवी संस्थांसाठी मोठी संधी; 1 ते दीड वर्षे वयाची रोपे केवळ पाच रुपये प्रतिरोप दराने उपलब्ध.

**पुणे | प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महापालिकेच्या उद्यान विभागाकडून छत्रपती संभाजीराजे उद्यानात वनमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या वनमहोत्सवात स्थानिक जातींची एक ते दीड वर्षे वयाची विविध रोपे पाच रुपयांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहेत. वाढत्या तापमानावर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी महापालिकेच्या उद्यान विभागाने सुरू केलेल्या हरित पुणे, समृद्ध पुणे मोहिमेअंतर्गत छत्रपती संभाजीराजे उद्यानात पाच जून ते १४ ऑगस्ट या काळात वनमहोत्सवाचे आयोजन केले आहे. या महोत्सवात अल्पदरात रोप विक्री, वृक्षारोपण तसेच बीज संकलन केंद्र आदींचा समावेश आहे. या महोत्सवाचे उद्घाटन अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले.

या वेळी नवचैतन्य हास्ययोग परिवाराचे मुख्य समन्वयक आणि विश्वस्त मकरंद टिल्लू, ॲड. राजेंद्र आगरवाल, महापालिकेचे उद्यान विभागप्रमुख डॉ. अशोक घोरपडे, मुख्य अभियंता राजेश बनकर, उद्यान अधीक्षक संतोषकुमार कांबळे यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. वनमहोत्सवात नागरिक, वृक्षप्रेमी आणि स्वयंसेवी संस्थांना स्थानिक जातींची एक ते दीड वर्षे वयाची रोपे केवळ पाच रुपये प्रतिरोप या सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत,

तसेच नागरिकांनी त्यांच्या परिसरातील वृक्ष आणि फळझाडांच्या बिया बीज संकलन केंद्रात जमा करून रोपनिर्मिती उपक्रमात सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. याच कालावधीत घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत तयार करण्यात आलेले सेंद्रिय खतही उपलब्ध करून देण्यात आले आहे.



### हरित पुणे, समृद्ध पुणे' मोहिमेला चालना

» जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महापालिकेच्या उद्यान विभागातर्फे छत्रपती संभाजीराजे उद्यानात आयोजित वनमहोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. 'हरित पुणे, समृद्ध पुणे' मोहिमेअंतर्गत ५ जून ते १४ ऑगस्ट या कालावधीत स्थानिक जातींची एक ते दीड वर्षे वयाची रोपे केवळ पाच रुपये दराने उपलब्ध करून देण्यात येत आहेत. याशिवाय वृक्षारोपण, बीज संकलन केंद्र आणि सेंद्रिय खत विक्री यांसारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत. पर्यावरण संवर्धन, हरित क्षेत्रवाढ आणि नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत असून वृक्षलागवडीचा संदेश व्यापक स्तरावर पोहोचवला जात आहे.

# आयटी पार्कमध्ये कंपन्या, सोसायट्यांचे एसटीपी बंद!

## हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमधील अनेक गृहनिर्माण संस्था आणि कंपन्या सांडपाणी प्रक्रिया न करता थेट पावसाळी वाहिन्यांमध्ये सोडत आहे

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमधील अनेक गृहनिर्माण संस्था आणि कंपन्या सांडपाणी प्रक्रिया न करता थेट पावसाळी वाहिन्यांमध्ये सोडत आहे. त्यांचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) सुरू नसल्याची बाबही उघडकीस आली आहे. या प्रकरणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) आता नियम भंग करणाऱ्यांना दणका देण्याचे पाऊल उचलले आहे.

आयटी पार्कमधील टप्पा क्रमांक दोनमध्ये डोहलर कंपनीच्या परिसरातील गृहनिर्माण संस्था आणि कंपन्यांकडून सांडपाणी थेट पावसाळी वाहिन्यांमध्ये सोडले जात आहे. गेल्या वर्षी आयटी पार्कमध्ये पावसाळ्यात पाणी साचून जलकोंडी निर्माण झाली होती. याची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी एमआयडीसीकडून पावसाळापूर्व कामांना गती देण्यात आली आहे. गेल्या वर्षी डोहलर कंपनीसमोर मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. तेथील पावसाळी वाहिन्यांचे काम एमआयडीसीकडून सुरू आहे. पावसाळी वाहिन्यांचे काम करीत असताना अनेक गृहनिर्माण संस्था आणि कंपन्या थेट सांडपाणी बाहेर सोडत असल्याची बाब निदर्शनास आली.



### पाहणी मोहीम सुरू

» आयटी पार्कमध्ये अनेक कंपन्या आणि गृहनिर्माण संस्थांचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बंद असल्याच्या तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे आयटी पार्कमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची पाहणी करण्याची मोहीम हाती घेतली आहे. यात कंपन्या आणि गृहनिर्माण संस्थांकडून नियमभंग आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी बाबासाहेब कुकडे यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर एमआयडीसीने गृहनिर्माण संस्थांसह कंपन्यांना नोटिसा बजावल्या आहेत. त्यात म्हटले आहे की, गृहनिर्माण संस्थांसह कंपन्यांकडून सांडपाणी थेट पावसाळी वाहिन्यांमध्ये सोडले जात आहे. हे काळे आणि दुर्गंधीयुक्त दूषित पाणी असल्याने सफाई कामगारांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे कामगारही सफाईसाठी वाहिन्यांमध्ये उतरण्यास तयार नाहीत. हे दूषित पाणी पुढे पीएमआरडीएच्या हद्दीतील शेतजमिनींमध्ये जात आहे. याबाबत शेतकऱ्यांनीही तक्रारी केल्या आहेत. संबंधितांनी हे सांडपाणी बाहेर सोडणे तत्काळ बंद करावे अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल.

आयटी पार्कमध्ये अनेक कंपन्या आणि गृहनिर्माण संस्थांचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बंद असल्याच्या तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे आयटी पार्कमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची पाहणी करण्याची मोहीम हाती घेतली आहे. यात कंपन्या आणि गृहनिर्माण संस्थांकडून नियमभंग आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी बाबासाहेब कुकडे यांनी नमूद केले.

### सांडपाण्यावर प्रक्रिया गरजेची

» गृहनिर्माण संस्था आणि कंपन्यांनी सांडपाण्यावर प्रक्रिया करणे गरजेचे असून, त्यांनी दूषित पाणी बाहेर सोडू नये. हिंजवडी आयटी पार्क परिसरातील गृहनिर्माण संस्था आणि कंपन्यांकडून पावसाळी वाहिन्यांमध्ये सांडपाणी सोडले जात असल्याच्या तक्रारी आहेत. या प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला कारवाईचे अधिकार असून, त्यांना याबाबत पत्र पाठविण्यात आले आहे, असे पीएमआरडीएचे मुख्य अभियंता शिवप्रसाद बागडी यांनी सांगितले.

### कामगारांच्या आरोग्यास धोका

» आयटी पार्कमधील पावसाळी वाहिन्यांचे काम करताना त्यात थेट सांडपाणी सोडले जात असल्याची बाब उघडकीस आली. या दूषित पाण्यामुळे सफाई करणाऱ्या कामगारांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. या प्रकरणी संबंधित गृहनिर्माण संस्था आणि कंपन्यांना नोटिसा बजावून कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे, एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता राजेंद्र तोतला यांनी स्पष्ट केले.

# पुणे बाजार समिती युजर चार्जेसविरोधातील आवक बंद आंदोलन स्थगित

## मंत्रालयातील सकारात्मक चर्चेनंतर व्यापाऱ्यांचा निर्णय; युजर चार्जेसच्या अंमलबजावणीला स्थगिती देण्याचे शासनाचे आश्वासन

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या युजर चार्जेस आकारणीविरोधात राज्यभरातील व्यापाऱ्यांनी पुकारलेले आवक बंद आंदोलन अखेर स्थगित केले आहे. पणनमंत्री जयकुमार रावल यांच्यासोबत झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर युजर चार्जेसच्या अंमलबजावणीला स्थगिती देण्याबाबत आणि संबंधित कायद्याचा पुनर्विचार करण्याबाबत शासन सकारात्मक भूमिका घेणार असल्याचे आश्वासन मिळाल्याने महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती आणि दि पूना मर्चंट्स चेंबरने हा निर्णय घेतला आहे



यासंदर्भात मंगळवारी (दि. ९ जून) मंत्रालयात व्यापारी प्रतिनिधींची महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीने गत महिन्यात २२ मे रोजी युजर चार्जेस आकारणीबाबत काढलेल्या परिपत्रकाच्या निषेधार्थ दि पूना मर्चंट्स चेंबरने आंदोलनाची हाक दिली होती

याच अनुषंगाने राज्यातील व्यापाऱ्यांनी ५ जूनपासून शेतकऱ्यांकडून थेट येणारा माल वगळता भुसार बाजारातील नियमित, अनियमित आणि अनुषंगिक सर्व प्रकारच्या मालाची आवक बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, ४ जून रोजी पणनमंत्री जयकुमार रावल यांच्यासोबत झालेल्या संयुक्त बैठकीत व्यापारी संघटनांची बाजू सविस्तरपणे मांडण्यात आली

या बैठकीत युजर चार्जेसच्या अंमलबजावणीला स्थगिती देण्याबाबत, तसेच संबंधित कायद्याचा पुनर्विचार करून तो रद्द करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला

> युजर चार्जेससह इतर प्रलंबित विषयांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. ९) मंत्रालयात व्यापारी प्रतिनिधींची बैठक आयोजित केली आहे. शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याने महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती आणि दि पूना मर्चंट्स चेंबरने पुकारलेले आवक बंद आंदोलन तूर्तास स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.
>
> - राजेंद्र बाठीया, अध्यक्ष, दि पूना मर्चंट्स चेंबर.